छाया : दिलीप कागडा, संतोष परब



'लोकसत्ता बदलता महाराष्ट्र' उपक्रमात 'सार्वजनिक आरोग्य' या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडच्या उत्तरा अय्यर, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी, केसरी टूर्सचे प्रमोद दळवी आणि कार्यकारी प्रकाशक वैदेही ठकार.

## आज काय?

**सत्र पहिले** | विषय- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाहतूक व्यवस्था तोट्यात का?
वक्ते- तुकाराम मुंढे, आयुक्त, नाशिक महापालिका
विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरी मंच

**सत्र दुसरे** | विषय- वाहतूक : सुरक्षा व सुरक्षितता, पर्यावरण, आरोग्य
वक्ते- डॉ. रश्मी करंदीकर, उपायुक्त, मुंबई पोलीस
समीर झवेरी, सामाजिक कार्यकर्ता,
डी. स्टॅलिन, संचालक, वनशक्ती संस्था

**सत्र तिसरे** | विषय- प्रकल्पपूर्ती : काळ, काम आणि वेग
वक्ते- संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त, मुंबई महापालिका; सुभाष नागे, निवृत्त, मुख्य अभियंता, राज्य रस्ते विकास महामंडळ
विजय गार्गव, प्रकल्प सल्लागार आणि निवृत्त अतिरिक्त मुख्य अभियंता

## पहिले सत्र : एकात्मिक वाहतूक व्यवस्था

# प्रवासीकेंद्री वाहतूक व्यवस्था आवश्यक!

प्रतिनिधी, मुंबई

**सुलभ, सुखकर** आणि सुरक्षित प्रवासासाठी प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवून एकात्मिक वाहतूक व्यवस्था उभी करण्याची गरज असून, यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील यंत्रणांनी परस्परांमध्ये स्पर्धेऐवजी सहकार्याची भावना जोपासण्याची गरज आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मोफत किंवा स्वस्तात उपलब्ध होण्याऐवजी तीं गुणवत्तापूर्ण असावी, असा दृष्टिकोन प्रवाशांनी ठेवायला हवा, असे मतही त्यांनी मांडले.

'लोकसत्ता बदलता महाराष्ट्र'च्या पहिल्या सत्रामध्ये 'एकात्मिक वाहतूक व्यवस्था' या विषयावर त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाचे सहप्रायोजक एमईपी इन्फ्रान्स्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेड आणि केसरी टूर्स आहेत. मुंबईमधील ७० ते ७५ टक्के प्रवासी रोज सार्वजनिक वाहतूक सेवेवर अवलंबून असतात. उपनगरीय रेल्वे आणि मेट्रोला बेस्ट पूरक ठरू शकेल. त्या दृष्टीने बेस्टने मार्ग आणि वेळापत्रकामध्ये बदल करावे, अशी सूचना भिडे यांनी केली.

रेल्वे, मेट्रो आणि बेस्टची सेवा एकमेकांशी जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो स्थानकाजवळ बसचे थांबे उपलब्ध व्हावे, यासाठी चर्चा सुरू आहे. आझाद मैदानातील मेट्रोचे भूमिगत स्थानक सीएसएमटी स्थानकाला जोडण्यात येईल. तसेच चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळच मेट्रोचे स्थानक असेल. वांद्रे-कुर्ला संकुलात 'मेट्रो-२' व 'मेट्रो-३' एकमेकांशी जोडले जावेत, या दृष्टीने अभ्यास सुरू असल्याचे भिडे यांनी सांगितले. प्रवाशांना प्रवास कसा घडणार याची पूर्वकल्पना असायला हवी, हे सांगताना त्यांनी लंडन आणि सिंगापूर येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे दाखले दिले. सामाईक तिकीट (कॉमन मोबिलिटी कार्ड) या संकल्पनेचे महत्त्वही त्यांनी विशद केले. सर्व यंत्रणांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये सुसंवाद घडविण्यासाठी आवश्यक असलेली 'युनिफाईड मेट्रोपॉलिटन ट्रान्स्पोर्ट ॲथॉरिटी' सक्षम करण्याची आणि त्याला बळकटी देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे, रेल्वे बोर्डाचे माजी अध्यक्ष विवेक सहाय, मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष रवी शंकर खुराना.

शहराच्या पूर्व-पश्चिम भागांना जोडणारी वाहतूक व्यवस्था मेट्रोमुळे निर्माण करता येणार आहे. मुंबईत मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गांवर १२० स्थानके आहेत. या स्थानकांमध्येच अन्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांची केंद्रे असायला हवीत. रेल्वे स्थानकांवर भक्कम छत बांधून त्यावर बेस्टचे आगार आणि स्थानकाखाली मेट्रोचे भुयारी स्थानक, अशा व्यवस्थेची गरज आहे. तशी व्यवस्था निर्माण झाल्यास प्रवाशांच्या गर्दीची विभागणी करणे शक्य होईल, असे रेल्वे बोर्डाचे माजी अध्यक्ष विवेक सहाय यांनी सूचविले.

लोकल सेवा अस्तित्वात असलेल्या जगातील अन्य शहरांपैकी टोकीओ, हाँगकाँग येथे प्रवासी सरासरी १५ ते १६ किलोमीटर इतका प्रवास करतात. आपल्याकडे हा प्रवास सरासरी ३४ किलोमीटरहून अधिक आहे. म्हणजे आपल्याकडचे प्रवासी सरासरी एक तास किंवा त्याहून अधिक वेळ प्रवासात घालवतात. प्रवाशांना एकाच तिकिटावर (कॉमन मोबिलिटी कार्ड) मेट्रो, रेल्वे, बेस्टमधून प्रवास करता यावा यासाठी सुसज्ज यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. रेल्वेप्रमाणे सार्वजनिक बस सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची उभारणी करायला हवी. यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळ मिळेल आणि प्रदूषणाला आळा घालणे शक्य होईल, असा विश्वास विवेक सहाय यांनी व्यक्त केला.

सार्वजनिक वाहतूक सेवा पुरवणाऱ्या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एकाच ठिकाणी वाहतुकीचे विविध पर्याय उपलब्ध असल्यास प्रवाशांची ओढाताण कमी होईल यात दुमत नाही. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने अंधेरीच्या धर्तीवर १९ स्थानकांचा विकास सुरू केला आहे. यापैकी मोजक्या स्थानकांवर बस स्थानकाची निर्मिती करणे शक्य आहे. मात्र उर्वरित स्थानकांमध्ये तशी परिस्थिती नाही. त्यासाठी रेल्वे स्थानकांभोवतीच्या ५०० मीटर परिघाचा पुनर्विकास करणे गरजेचे आहे. मात्र, पुनर्वसनाची प्रक्रिया अनेकदा अडचणीची ठरते. त्यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ, पण बळकट करणे आवश्यक आहे. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पांच्या विविध टप्प्यांमध्ये रेल्वेने प्रवासी क्षमता वाढवली. पण प्रवाशांची गर्दी वाढतच आहे, अशी खंत मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष आर. एस. खुराना यांनी व्यक्त केली.